Impact Factor 2. 147

ISSN 2349-638x

Refereed And Indexed Journal

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

Monthly Publish Journal

VOL-III ISSUE-VIII Aug. 2016

Address
•Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
•Tq. Latur, Dis. Latur 413512
•(+91) 9922455749, (+91) 9158387437

Email
•aiirjpramod@gmail.com

Website
•www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

# व्यक्तीमत्व विकासासाठी कौशल्य,क्षमता,उपक्रम ; एक अभ्यास

प्रा.डॉ.सुशील शेषेराव शिंदे
जयक्रांती अध्यापक महाविद्यालय,
लातुर.

**प्रस्तावना:—**

असे म्हटले जाते की, Skill are the wheels जर बारकाईने या वाक्याचे निरीक्षण केले तर असे लक्षात येते की, skills म्हणजे मानवाचे सुप्तगुण आहेत आणि त्यांच्या योग्य आणि दिशापूर्ण वापराने माणसाच्या स्वत:च्याच नव्हे तर समाजाच्या विकासाला गती येते. मानवाला अनेक गुणदोषांची देणगी मिळाली आहे. म्हणूनच गुण हेरणे आणि दोष मारणे हेच व्यक्तीमत्व विकासातील महत्वपूर्ण पाऊल आहे. आणि जेव्हा हे गुण सकारात्मक योजनांचे विकास मुद्दे ठरतात तेव्हाच त्यांना skills म्हणू शकते सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे या दोन s….s मध्ये kill आहे ते दूर ठेवणे गरजेचे म्हणजेच नेहमीच तुमची आंतरिक उर्जाशक्ती ताजी आणि खिलाडूपणाची असणे हे कौशल्य धारणक्षमतेचे घातक ठरते. आणि मग व्यक्तीगत सामाजिक पातळीवर जेव्हा व्यक्ती मूल्ये पेरून गरजांची परिपूर्तता करू शकते तेव्हा ती कौशल्याधिष्ठीत ठरते आपल्या उर्मी, उर्जा समाजासाठी आणि विकासासाठी वापरण्यास उपयुक्त करणारे उपक्रम म्हणजेच कौशल्याधिष्ठित उपक्रम होय. उत्पादनाकार्यात सहभागी होतानाच आपली कौशल्य पडताळण्याची एक सकारात्मक दर्जासंधी उपलब्ध होते. ज्यातून कौशल्यांचा वापर, विकसन आणि निर्धारण होत राहते. म्हणूनच वापर विकसन आणि प्रत्येक उपक्रम हे कौशल्याविष्टीत उपक्रम ठरतात.

*** कौशल्यातून मूल्ये:—**

१. पर्यावरण संरक्षण व संवर्धन
२. श्रमप्रतिष्ठा
३. समस्यापूर्ती सामर्थ्य
४. कार्यदक्षता
५. टाकाऊ ते टिकाऊ ध्यास
६. संस्कृतिरक्षण
७. सहनशीलता
८. सहकार वृत्ती

अशा कौशल्यापूरक आणि कौशल्याधिष्ठत उपक्रमामधून विदयार्थ्यांची उपक्रमशीलता वाढतेच परंतू त्या जोडीने त्यांचा व्यक्तीमत्व विकासही होतो. थेंबे थेंबे तळे साचे या उक्तीप्रमाणे त्यांचे कौशल्य कणाकणाने वाढते म्हणूनच अशा पुरक उपक्रमाचे योग्य आयोजन व नियोजन व्यक्तीमत्वात भर घालते.

*** कौशल्यधिष्ठीत उपक्रम, फायदे व कमतरता:—**

शिक्षण म्हणून काम करताना प्रत्येक विद्यार्थ्यांच्या अंगभूत क्षमतांची त्याला जाणीव होते. मूलाकडे काही क्षमता या जन्मापासूनच असतात तर काही क्षमतांचे प्रयत्नपूर्वक ग्रहण करावे लागते. या सर्व प्रक्रियेमध्ये त्याला विकसनाच्या पायऱ्यावर कोणाचे तरी मार्गदर्शन सराव व स्व प्रयत्नांची अत्यंत गरज असते. अशा प्रकारचे कौशल्याधिष्ठित अध्ययन अनुभव विद्यार्थ्यांना देणे हे अत्यंत मोलाचे ठरते कोणत्याही कृती वारंवार घडत राहित्या की, वर्तमाचा भाग होउन जातात अशा बदलानांच कौशल्य म्हटले तर योग्यच होय म्हणूनच कौशल्याधिष्ठीत उपक्रम हे असे अध्ययन अनुभव असावेत. ज्यायोगे विद्यार्थ्यांची भावनिक भाषिक व सामाजिक कौशल्य विकसीत होतात. या उपक्रमाचे अनेक फायदे आहेत. त्याचप्रमाणे या उपक्रमात काही कमकरता आहेत. म्हणुनच जेव्हा आपन 'strong points' चा अभ्यास करतो तेव्हाच 'weaknesse' चा अभ्यासही गरजेचा असतो कारण 'weaknesse is the strong –reason'

*** कमतरतांचा प्रभाव**:—

उमक्रम राबवणे आणि उपक्रम योजने या दरम्यानचे अंतर जर आंनददायक असेल तर आधिक फायद्याचे ठरते. कौशल्याधिष्ठीत उपक्रमासाठी आवड सातत्य आणि सराव या तीन अंगाची विशेष आवश्यकता आहे. म्हणुन त्या पध्दतीचे प्रशिक्षण गरजेचे आहे कोणत्या प्रकारच्या कमतरता असतील ते नेमकेपणाने सांगता येईलच असे नाही. पंरतु काही शक्य कमतरता:—

१ उपक्रमातील नाविन्याचा अभाव.
२ योजक मार्गदर्शक नसणे.
३ विद्यार्थ्यीसंख्या अमर्याद असणे.
४ अनुत्साह नावड.
५ योग्य व आवश्यक साधनांचा अभाव.
६ कौशल्याच्या नेमकेपणाचा अभाव
७ कौशल्यपुरक अभ्यासक्रमाकडे दुर्लक्ष.
८ योग्य प्रेरणा व साधनांचा अभाव.

*** विविध कौशल्याधिष्ठीत उपक्रम:—**

कौशल्याचा जाणीवपूर्वक विकास करण्यासाठी काही विशिष्ट उपक्रम विचारात घेणे आवश्यक आहे. म्हणूनच अशा उपक्रमात नाविन्यपूर्ण विषय देणे गरजेचे आहे. अशावेळी हे उपक्रम material based करता येतात

*** साधनाधारित विषय:—**

१. कागद :— वस्तू
२. लाकूड :— वस्तू
३. टाकाऊ ते टिकाऊ
४. नैसर्गिक साधने :— फळे, भाज्या इ.
५. इतर प्रासंगिक विविध वैज्ञानिक संच
६. बांबू :— वस्तू
७. घरगुती वस्तू :— गाळणी इ.

*** भास्कराचार्याच्या अष्टपैलू व्यक्तीमत्वाचे दर्शन** :—

भास्कराचार्याच्या लेखनावरून तसेच त्यांच्यावर आधारित उपलब्ध गृथावरून त्यांच्या अष्टपैलू व्यक्तीमत्वाचे दर्शन होते ते पूढील प्रमाणे.

१. **सुधारणावादी:—**
भास्कराचार्य सुधारणावादी होते ग्रहणे युक्त्या व अंतरिक्षचमत्कार पंचागाप्रमाणे वेळेवर होत नसतील तर पंचागे सुधारली पाहिजेत असे त्यांचे मत होते.

२. **निसर्गवादी:—**
निसर्गातील रम्य घटना पक्ष्यांचे थवे आकाशातील ढग, तलावातील पक्षी, फुले झाडावरील प्राणी यांचे वर्णन करून त्यावर गणितातील उदाहरणे तयार करून आपले निसंर्गप्रेम दर्शवलेले आहे.

३. **धर्मशास्त्राचा प्रचारक:—**
धर्मशास्त्र पुराण व संस्कृती यावर आधारित ज्ञानाची देवाण घेवाण करण्याचा प्रयत्न करून त्यातून धर्मशास्त्राचा प्रचार कसा करता येईल यासाठी भरपूर प्रयत्न केले.

४. **उत्कृष्ट संशोधक:—**
ग्रह तारे व गाणितातील विविध संकल्पना यावर सखोल संशोधन करून आपल्या संशोधन वृतीचा परिचय दिलेला आहे.

५. **उत्कृष्ट लोकशिक्षक:—**
सामान्यांना गणित चांगल्या पध्दतीने कसे समजेल? यासाठी विविध अध्यापण कौशल्याचा तत्वांचा व सुत्राचा उपयोग केलेला आहे.

६. **गणितप्रेमी:—**

गणितावरील लेखन व गणित शिकविण्याची तळमळ गणितात स्वत:ला झोकून देणे हे त्यांच्या गतितप्रेमाचे प्रतिक आहे.

७. **खगोलप्रेमी:—**
खगोल शास्त्रावर लिहलेले ग्रंथ त्यावर केलेले संशोधन त्यांच्या खगोलप्रेमीची प्रचिती दर्शवते.

८. **समाजिक परिस्थितीची जाण ठेवणारा:—**
तत्कालिन समाजात स्त्री व पुरूष गुलाम म्हणून विकले जायचे विद्वान मंडळीना राजाश्रय रात्रीचा प्रवास धोकादायक निष्क हे चलन म्हणून वापरण्यात येणारे चांदीचे नाणे अशा विविध बाबीचे हुबेहुब चित्रण त्यांनी आपलया ग्रंथात रेखाटले आहे.

९. **उत्कृष्ट इंजिनिअर:—**
भास्कराचार्यांनी खगोल शास्त्रच्या अभ्यासाला पुरक व उपयुक्त अनेक उपकरणे बनवली

१०. **उत्कृष्ट लेखक व कवी:—**
भास्कराचार्यांनी आपले ग्रंथ काव्यरूपात लिहिलेले आहेत.

११. **शब्दाचा निर्माता:—**
ललितशास्त्राचे संकेत उपयोजून अनेक संख्यादर्शक शब्द त्यांनी निर्माण केलेले आहेत.

१२. **शारीरिकदृष्टया सुदृढ:—**
भास्कराचार्य शेवटपर्यंत शरीराने धडधाकट व सुदृढ होते. व्यक्तीच्या विकासात शारीरिक विकासही महत्वपूर्ण आहे हे त्यांच्या जीवनकार्यावरून लक्षात येते.

१३. **स्पष्टवादी:—**
भास्कराचार्य स्पष्टवादी असून नियमांचे पालन करणारे आहेत ते स्वत:ला गुप्ताची सुत्रे विनाकारण लांबलचक असतील तर त्यावरही टीका करण्यास मागेपूढे पाहत नाही.

यासाठी केवळ प्रशासन उपयागाचे नाही तर ते सुप्रशासन हवे. जनतेचा वेळ, श्रम, पैसा न घेता स्वच्छ व पारदर्शक, सुत्रबध्द व्यवस्थेस सुप्रशासन असे म्हणता येईल.

१. **पारदर्शकता:—**पारदर्शकता म्हणजे स्वच्छ लपवालपवी संदिग्धता, अशा कृतीला यात वाव नसतो. निसंदिग्धता, नैतिकता, पवित्र आचरण व सुटसुटीत कार्यप्रणाली आस्तीत्वात आणणे म्हणजे पारदर्शकता होय.

२. **उत्तरदायित्व:—**ज्या पदावर काम करत असतो त्या पदाच्या काही जबाबदाऱ्या असतात कोणाला तरी त्याबाबत आपण जाब/उत्तर देणे लागतो दिलेले काम अचुकपणे यशस्वी करण्यास आपण जाबाबदार आहेत ही भावना म्हणजे उत्तरदायित्व होय.

३. **विश्वासार्हता:—**विश्वासार्हता ही सुप्रशासनाचा आत्मा आहे. लोकमनातील साशंकता भीती दुर करून आदराने व विश्वासाने पाहण्यास पात्र होण्यास आवश्यक परिस्थिती निर्माण करणे होय.

४. **जबाबदारी:—**उत्तरदायित्व व जबाबदारी या एकाच नाण्याच्या दोन बाजू होय अधिकार कक्षेतील कामे सुव्यवस्थित होण्यासाठी नियमबाह्य घटकाचा वापर न करता, पदाचा अधिकाराचा गैरवापर न करता इमानइतबारे कर्तव्य पालन करणे.

५. **बांधिलकी:—**लोकसेवक म्हणून ज्या समाजाच्या सेवेसाठी नेमणूक केलेली आहे. त्या कर्तव्य व जबाबदारीशी प्रामाणिक राहून कार्य करणे.

६. **नि:स्वार्थीपणा:—**सार्वजनिक पदावर लोकसेवक म्हणून काम करताना कोणताही वैयक्तिक स्वार्थ ठेवून स्वत:कुटूंब मित्र नातेवाईकासाठी निर्णय न घेणे.

७. **सचोटी:—**कर्तव्याशी फरक होईल अशा व्यक्ती संस्था यांच्या आर्थिक व अन्य उपकारांच्या ओझ्याचा भार न घेणे.

८. **वस्तूनिष्ठता:—**कोणताही स्वार्थी हेतू किंवा पूर्वग्रहदुषित मत न ठेवता लोकसेवकांनी केवळ आणि केवळ गुणवत्तेवर भर दयावा.

९. **नेतृत्व:—**उच्चपदस्थ आधिकाऱ्यांनी निष्ठा नैतिकतेने कर्तव्य बजावून अखत्यारित्या कर्मचाऱ्यासमोर उत्कृष्ठ नेतृत्वाचे उदाहरण ठेवावे व प्रतिंबा दयावा यासाठी प्रत्येक व्यक्तीने/लोकसेवकाने वरील तत्वाचे पालन केल्यास भष्टाचारमुक्त समाजाचे स्वप्न साकार होईल व खऱ्या अर्थाने समाज राष्ट्राच्या समतोल सर्वांगीण विकासास वेग येईल याची सुरूवात आज आतापासूनच करावी लागेल अशा परिस्थितीत कुठेतरी श्रद्धा ठेवून समाज घडविणाऱ्या क्षेत्रांकडे आशेने पाहावेच लागेल ते म्हणजे शिक्षण अं.....अं....अं थांबा! मी औपचारिक शिक्षण असे म्हणत नाही मी पालक समाज अनौपचारिक आणि औपचारीक शालेय शिक्षण असे म्हणतो कारण प्राथमिक ते

उच्च भारतीय शिक्षणप्रक्रियेतील भ्रष्टाचाराची प्रकरणे आपण रोज ऐकतो वाचतो आहोत याचा अर्थ असा नाही की संपूर्ण परिस्थितीच हाताबाहेर गेली आहे. आजही प्रामाणिकपणे काम करणारे अनेक हात पूढे येताना प्रत्यक्ष काम करताना आपणास दिसतात.

**संदर्भ सुची**

१. डॉ.व्हि.पी. कुलकर्णी (२०१५),कौशल्याधिष्टित उपक्रम आणि व्यक्तीमत्व विकास, भारतीय शिक्षण महाराष्ट्र भारतीय शिक्षण, मंडळ, मुंबई.
२. प्रा.किरण ननवरे (२०१५),भारतीय समाजासाठी शिक्षण, भारतीय शिक्षण,महाराष्ट्र भारतीय शिक्षण मंडळ, मुंबई.
३. डॉ.के व्हि. पुंजु (२०१५),पाठयपुस्तकातील उपक्रम विद्यार्थीच्या कृतीशील सहभागाचा परिणामकारक मार्ग, भारतीय शिक्षण, महाराष्ट्र भारतीय शिक्षण मंडळ, मुंबई.
४. डॉ.आर.व्ही.पटवारी (२०१०),तरूणाच्या विकासासाठी शिक्षक शिक्षणाची भुमिका, पसायदान प्रकाशन, नागपुर.
५. डॉ.नरेंद्र कडु (२०१०),प्रभुत्व अध्ययन; काळाची गरज, पसायदान प्रकाशन, नागपूर.
६. प्रा.के. व्ही. भारती (२०१२),समावेशक शिक्षण काळाची गरज, अनुराग प्रकाशन, कल्याण.

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com